निघालेला व मुलावर भलतीच कळा दिसूं लागली. ताप नसल्यामुळें माधवरावांची पुडी दिली नाहीं. मुलाचें शरीर थंड लागूं लागलें. मामांनी शेवटीं महाराजांची अनन्य भावानें प्रार्थना करून उदी व तीर्थ दिलें. मुलाला आराम पडूं लागला. व शेवटीं तो उदीनेंच बरा झाला.

भाऊसाहेब विठोबा थोरात हे तळेगांव दाभाडे येथें फौजदार आहेत. हे डॉ. शिरसाठे यांचे जांवई. त्यामुळें त्यांचे घरांत श्रीसाईबाबांची स्थापना होऊन मंडळी महाराजांचे भक्तीला लागलेली आहेत. एके वेळीं फौजदारसाहेब फिरतीवर गेले होते. त्यांची मातोश्री शिरडीस गेली होती. घरांत तीन वर्षांचा भाऊसाहेबांचा लहान मुलगा होता. त्याला झटके येऊं लागले. मंडळींनीं त्याला फक्त उदी दिली. व त्यामुळें त्याचे झटके थांबले.

## श्री साईनाथ प्रसन्न.

साईनाथ बाबांच्या भजनाला लागल्यापासून मला अनेक व अपूर्व असे अनुभव आले आहेत व येत आहेत. त्यांच्या पूजेच्या वेळीं भजनांत येणारा अननुभूत प्रेमानंद मलाहि थोडासा मिळावा व पूजेच्या निमित्तानें त्यांची अल्पसी उपासना घडावी या हेतूनें मी माझ्या घरीं त्यांची पूजा करण्याचा संकेत केला. त्यांच्या उपासनेला लागल्यापासून मी माझ्या देव्हाऱ्यांत संत मालिकेंतील महात्म्यांच्या पुष्कळ फोटोंचा संग्रह केला आहे. कृत संकल्पाप्रमाणें मी पूजेचा दिवस नक्की केला. पूजेकरतां केलेल्या व शृंगारलेल्या देव्हाऱ्यांत साईनाथ महाराजांचा फोटो, बरोबर तितक्याच उंचीचा साधुवर्य मडके बुवांचाही फोटो ठेवण्यांत आला होता. कित्येक प्रसंगीं त्यांनीं आपल्या पवित्र व मंगल दर्शनानें मला पुनीत केलें होतें. पूजेला सुरवात झाली व पुढें पुढें भजन ऐन रंगांत आलें. त्यावेळीं माझें लक्ष अचूक मडके बुवांच्या फोटोवर गेलें व मनांत विचार आला कीं या प्रसंगीं मडके बुवांनीं

येण्याची कृपा केली तर किती मजा येईल. वास्तविक मडके बुवा त्यावेळीं कोठें होते तेंही मला माहीत नव्हतें. भजन जेव्हां ऐन रंगांत आलें तेव्हां माझ्या मनांत वरील विचारानीं पुन्हां उचल केली. तेव्हां मी उत्कट भावनेनें व दृढनिष्ठेनें प्रार्थना केली कीं बाबा आपण मडकेबुवांस या प्रसंगीं येथें बोलवावें आणि कदाचित आपण त्यांना बोलाविलेंही असेल व कदाचित ते माझ्या चर्मचक्षूला अगोचर असतील. तसें असल्यास त्यांच्या पुनर्दर्शनाचा योग येईल तेव्हां त्यांनीं मला या प्रसंगाची ओळख द्यावी. साईनाथ बाबांच्या फोटोशीं तादात्म्य पावून मी मनांत अशा प्रकारची प्रार्थना चालविली, त्यावेळीं बाबांनीं फोटोंत स्मितहास्य केल्याचा मला आभास झाला. त्यावरून मी क्यास बांधला कीं माझी प्रार्थना मंजूर झाली. व खरोखरच पुढें मला मडके बुवांच्या दर्शनाचा लाभ झाला. तेव्हां त्यांनीं या प्रसंगाची मला जाणीव दिली. वरचेवर अशा तऱ्हेच्या साईनाथ महाराजांबद्दल येत असलेल्या अनुभवामुळें माझी त्यांच्यावरील निष्ठा दृढ होत चालली आहे व त्यांच्या उपासनेंतच आपला तरणोपाय आहे अशी माझी खात्री झाली आहे.

आपल्या सर्वांचा एक गरीब दासानुदास

**सदाशीव बापूराव शिरसाठे**

अहमदनगर येथें महादबा फंड या नांवांचे काशीनाथ मामांचे एक मित्र आहेत. त्यांचा मुलगा विठोबा साधारण शिक्षण संपवून नोकरी पाहूं लागला. प्रथम त्यानें रेल्वे इंजिनियरकडे नोकरीकरतां अर्ज केला. पण उपयोग झाला नाहीं. त्यावर काशीनाथ मामांनीं त्याला साईनाथ बाबांची रोज पूजा करण्यास सांगितलें. तो कबूल झाला; पण २ महिन्यांत अनुभव आला तर तुमचे बाबा खरे असें मी मानीन असें तो म्हणाला मामांनींही त्याला ठांसून सांगितलें तूं दृढनिष्ठा ठेव

म्हणजे तुला खात्रीनें अनुभव थोडक्या वेळांत येईल. विठोबा त्या प्रमाणें भक्ति भावानें बाबांची पूजा करूं लागला. पुढें एक महिन्यानें त्याच ऑफिसांत जागा खाली झाली. विठोबानें अर्ज दिला. त्याच सुमारास पूर्वीच्या साहेबाची बदली झाली. नवा साहेब आला. त्याची व सदाशीवराव शिरसाठ्यांची ओळख होती. त्यांनीं साहेबाला भेटून विठोबाची शिफारस केली. साहेबांनीं विठोबाचा अर्ज निकालांत न आणतां शेरा मारून ठेवून दिला. त्यावेळीं हेडक्लार्कचा मुलगा एक उमेदवार होता व हेडक्लार्कची त्याच्याबद्दल खटपट चालली होती. शिवाय तिसरा एक इसम, ज्यानें पूर्वीं १० वर्षें त्या ऑफिसांत नोकरी करून राजिनामा दिलेला होता, तोही एक उमेदवार पुढें आला. जागा एक व उमेदवार तीन. त्यांतला एक पूर्वीं १० वर्षे नोकरी केलेला व दुसरा तर प्रत्यक्ष हेडक्लार्कचा मुलगा. तेव्हां विठोबाचे हात पाय बहुतेक गळाले. साहेबानें, तूं निष्कारण राजीनामा दिलास आतां तुला नोकरी मिळणार नाहीं असें सांगून एक उमेदवार तर अजिबात उडविला. राहिलेल्या दोघांत परीक्षा घेऊन जो पास होईल त्याला नोकरीवर लावण्याचें साहेबानें ठरविलें. परीक्षेचा दिवस ठरला. त्यांतही विठोबाला फारशी आशा वाटली नाहीं, कारण हेडक्लार्कचा मुलगा त्याच्यापेक्षां पुष्कळ ज्यास्त शिकलेला होता. परीक्षेच्या वेळीं उदीबरोबर घेऊन जा, कपाळाला लाव व थोडी कागदावर टाक म्हणजे तूं पास होशील असें मामानीं विठोबाला सांगितलें. चमत्कार असा कीं हेडक्लार्कचा मुलगा ऐनवेळीं गोंधळला. त्याला एकही उदाहरण सुटेना. विठोबानें मात्र बिनचूक उदाहरणें सोडविलीं व शेवटीं तो पास होऊन त्यालाच नोकरी मिळाली तेव्हांपासून बाबांवरती त्याची पूर्ण श्रद्धा जडून तो त्यांचा एकनिष्ठ भक्त बनला आहे.

## सौ. शांताबाई फडणीस यानीं आपले वडील ह. भ. प. उद्धवेश बुवा यांना लिहिलेल्या पत्रांतील उतारा:—

" ता. ६।७ ला अहिल्येचा वाढदिवस मोठ्या समारंभानें पार पडला. त्या दिवशींही एक चमत्कार झाला. बासुंदी १८ शेर दुधाची केली होती व आयत्या वेळेस आणिक पान वाढलें. माझे मनांत उदी टाकावयाची होती परंतु कदाचित् कोणी बायकांनीं पाहिल्यास निंदा करतील म्हणून गुपचिप दुरून फुंकून दिली. काय चमत्कार. २६ पान होऊन ६ वाढणी घसघसीत कीं अर्धा शेर तीन पाव इतकाली बासुंदी दिली. शिवाय वाड्यांतील मंडळींना मोठ्या कष्टानें कप कप देऊन शिवाय बायकांनाही कप कप पोंहचविली व दुसरे दिवशीं १॥ एक कप राहिली, म्हणजे आश्चर्य नाहीं तर काय ? "

# अध्याय ४३ वा

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुभ्यो नमः ।

श्रीकुलदेवतायै नमः । श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ।

॥ श्रीसद्गुरुसाईनाथाय नमः ॥

पूर्वाध्यायीं झालें निरूपण । संत साई समर्थ निर्याण ॥
आतां जें अवशेष अपूर्ण । होईल कीं संपूर्ण ये ठायीं ॥ १ ॥
साईलागी प्रेम अद्भुत । तेंही उपजवी तोच समर्थ ॥
हेमाड तयाचे चरणीं निरत । रेखाटित कीं तच्चरित ॥ २ ॥
तोच देई भक्तिप्रेमा । तोच वाढवी चरित्र महिमा ॥
तेणेंच गौरव भजन धर्मा । येई उपरमा संसार ॥ ३ ॥
म्हणोनी काया वाचा मनें । तया माझीं सहस्रांत नमनें ॥
चितवे न त्याचा महिमा चिंतनें । केवळ अनन्यें शरण रिघें ॥ ४ ॥
सांचला पापाचा मळ । तो धुऊनि काढावया सकळ ॥
करावया अंतर निर्मळ । इतर निष्फळ साधन ॥ ५ ॥
करणे हरिभक्त यशस्मरण । तयांचें भजन अथवा कीर्तन ॥
त्याविण चित्तशुद्धीसीं साधन । सोपें न आन शोधितां ॥ ६ ॥
असो गतकथानुसंधान । करूं संकलित पर्यालोचन ॥
साई निजानंदावस्थान । चालवूं व्याख्यान पुढारा ॥ ७ ॥
मागां साद्यंत जाहलें कथन । विजयादशमीसचि कां प्रयाण ॥
तात्याबामिषें भविष्य निवेदन । आधींच कैसेनि जाहलें ॥ ८ ॥

पुढें होतां देहावसान । राखूनिया धर्मविधान ॥
कैसें लक्ष्मीस केलें दान । जाहलें निरूपण समग्र ॥ ९ ॥
आतां ये अध्यायीं कथन । कैसें निकट येतां निधन ॥
साई करीत रामायण श्रवण । हितार्थ ब्राह्मण मुखानें ॥ १० ॥
कैसें समाधिस्थान नियोजन । कैसें अलक्षित इष्टका पतन ॥
कैसें समाधिस्थान नियोजन । दत्तावधान परिसावें ॥ ११ ॥
तैसेंच एकदां ब्रह्मांडीं प्राण । चढवूनि बैसतां तीन दिन ॥
कैची समाधी तेंच देहावसान । निश्चितमन जन झाले ॥ १२ ॥
केली उत्तर विधीची तयारी । अवचित बाबा देहावरी ॥
येतांच लोक दचकले अंतरीं । कैसी तेपरी परिसिजे ॥ १३ ॥
असो आतां हे निर्याण कथा । श्रोते श्रमतील श्रवणकरितां ॥
ही तो देहावसानाची वार्ता । नरुचे चित्ता कवणाच्या ॥ १४ ॥
परी हें साधुसंतांचें निर्याण । श्रोत्यांवक्त्यां करील पावन ॥
विस्तारभयास्तव भागशः श्रवण । करावें समाधान राहीतों ॥ १५ ॥
देहत्यागें अगम्यगति । निजप्राप्ति सुखाची वसती ॥
बाबा पावले अक्षय स्थिति । पुनरावृत्ति विरहित ॥ १६ ॥
देहधारणें होतें व्यक्त । देहत्यागें पावले अव्यक्त ॥
जरी एकांग अवतार समाप्त । सर्वांग सुव्यक्त लाधलें ॥ १७ ॥
एकदेशीयत्वा मुकले । सर्व गतत्वातें पावले ॥
पूर्णपणें सनातन झाले । निजीं समरसले निजत्वें ॥ १८ ॥
साई सकळांचें जीवन । साई सकळांचा जीव प्राण ॥
साईवीण ग्रामवासीजन । हीनदीन जाहले ॥ १९ ॥
देह पडतां निचेष्टित । जाहला एकचि आकांत ॥
आबाळवृद्ध चिंताक्रांत । जाहला प्राणांत समस्तां ॥ २० ॥

---

१ वीट.

नवज्वरादि लौकिकी बाधा । पाठीस लागती प्रपंच बद्धा ॥
योगियांच्या वाटे कदा । अमर्यादा न करिती ॥ २१ ॥

चेतवोनियां निज तेजातें । संत दाहिती निज देहातें ॥
तोच कीं प्रकार निजहातें । बाबा करिते जाहले ॥ २२ ॥

न व्हावें तें होऊनि गेलें । महाराज सायुज्यीं समरसले ॥
जन अत्यंत हिरमुसले । कुसमुसले मनांत ॥ २३ ॥

बरें होतें नसतों गेलों । अंत समयींच्या भेटीस मुकलों ॥
असतों कांहीं उपयोगा आलों । भुली भरलों प्रसंगीं ॥ २४ ॥

ऐशा नानाविध विचारांनीं । खिन्न झाला तो जो मनीं ॥
बाबांच्या काय अंत:करणीं । असेल तें कोणी जाणावें ॥ २५ ॥

नाहीं घरघर नाहीं श्वास । नाहीं खासी नाहीं कास ॥
नाहीं जीवाची कासावीस । केलें उल्हासें प्रयाण ॥ २६ ॥

आतां कैचें साई दर्शन । कैचें साईपदसंवाहन ॥
कैचें साईचरणक्षाळण । तीर्थप्राशन तें कैचें ॥ २७ ॥

तरी मग हे भक्त प्रेमळ । आली पाहोनि अंतवेळ ॥
दूर कले कां असतां जवळ । तयांस तळमळ लाविली कां ॥ २८ ॥

सर्वचि जीवाची भक्तमंडळी । पाहूनि जवळीं अंतकाळीं ॥
समयीं बाबांचे प्रेमास उसळी । अंतकाळीं येती कीं ॥ २९ ॥

पावावया सायुज्य सदन । आडवें येतें प्रेमबंधन ॥
वेळीं न करितां तयाचें छेदन । मन निर्वासन कैसेनी ॥ ३० ॥

ऐसें न घडतां देह पडला । सर्वेच चढला जीव घडघडला ॥
तात्काळ नवा संसार जडला । बाजार उघडला वासनेचा ॥ ३१ ॥

टाळावया हा प्रकार । साधूसंत दक्ष निरंतर ॥
बाबांच्याही मनाचा निर्धार । लोक व्यवहार रक्षावा ॥ ३२ ॥

अंतकाळीं हीच सावधता । शांतता आणि एकांतता ॥
ध्येय मूर्ती याची चित्ता । विक्षेपता विरहित ॥ ३३ ॥
'अंतेमतिः सागतिः' । हें तो प्रसिद्ध सर्व जाणती ॥
भगवद्भक्त स्वयें आचरती । लोकसंग्रह रीती हे ॥ ३४ ॥
अवकाश चवदा दिवस राहिला । काळ बाबांचा जवळ आला ॥
जाणोनि बाबांनीं वझे योजिला । वाचावयाला रामविजय ॥ ३५ ॥
मशीदींत वझे बैसले । पोथी पारायण सुरू झालें ॥
बाबा श्रवण करूं लागले । दिवस गेले कीं आठ ॥ ३६ ॥
पुढें बाबा आज्ञा करीत । पोथी चालवा अस्खलीत ॥
ऐसे तीन दिवस रात । वझे ती वाचित राहिले ॥ ३७ ॥
पूर्ण अकरा दिवस बैसले । पुढें अशक्तपणें ते थकले ॥
वाचतां वाचतां कंटाळले । ऐसे गेले तीन दिन ॥ ३८ ॥
पुढें बाबांनीं काय केलें । पोथी वाचन समाप्त करविलें ॥
वझ्यांस तेथून घालवून लाविलें । आपण राहिले निवांत ॥ ३९ ॥
घालवून लाविण्याचें कारण । म्हणतील श्रोते करवा कीं श्रवण ॥
करितों यथामती निवेदन । दत्तावधान परिसावें ॥ ४० ॥
निकट येतां देहावसान । साधूसंत आणि सज्जन ॥
घेती वाचवून पोथीपुराण । सावधान परिसती ॥ ४१ ॥
शुकाचार्य दिवस सात । कथिते झाले महा भागवत ॥
ऐकून धाला राजा परीक्षित । सुखें देहांत लाधला ॥ ४२ ॥
श्रवण करितां भगवल्लीला । भगवन्मूर्ती देखतां डोळां ॥
अंतकाळ जयाचा जाहला । तेणेंच साधिला निजस्वार्थ ॥ ४३ ॥
ही तो लोक प्रवृत्ति स्थिति । संत निरंतर स्वयें आचरती ॥
लोकसंग्रह मार्ग न मोडती । किंबहुना अवतरती तदर्थेची ॥ ४४ ।

१ या आडनावाचा बाबांचा एक भक्त.

जयां या भौतिकपिंडीं अनास्था । तयां देहावसानावस्था ॥
नाहीं दुःखशोकावेगता । ही स्वाभाविकता तयांची ॥ ४५ ॥

असो येथें श्रोतां शंकिजे । ब्रह्मसुखें सुखावले जे ॥
तयांस मायामोहें आतळिजे । बोल हा साजे कैसेनी ॥ ४६ ॥

जे स्वरूपीसावधान । अल्ला मालिक अनुसंधान ॥
तयांसी भक्तांचें संन्निधान । प्रतिबंधन कैसेनी ॥ ४७ ॥

तयाचा तो प्रपंच सरला । परमार्थही ठाईंच ठेला ॥
द्वंद्वभाव समूळ गेला । स्वयें संचला स्वरूप ॥ ४८ ॥

अक्षरेंअक्षर सकळ सत्य । यांत अणुमात्र नाहीं असत्य ॥
परि लोकसंग्रह अवतार कृत्य । करून कृतकृत्य संतजनीं ॥ ४९ ॥

संत षड्भाव विकार वर्जित । जे निरंतर अप्रकट स्थित ॥
भक्तोद्धारार्थ प्रकटीभूत । निधन किं भूत तयातें ॥ ५० ॥

देहेंद्रिय संयोग तें जनन । देहेंद्रिय वियोग तें मरण ॥
हें पाशबंधन वा उकलन । जन्ममरण या नांव ॥ ५१ ॥

जननापाठीं चिकटलें मरण । एकाहून एक अभिन्न ॥
मरण जीव प्रकृति लक्षण । जीवाचें जीवन ती विकृति ॥ ५२ ॥

मरण मारूनी जे उरती । पाय काळाचे शिरीं जे देती ॥
तयां काय आयुर्दायाची क्षिती । अवतरती जे स्वेच्छेनें ॥ ५३ ॥

भक्तकल्याणैक वासना । तेणें जे धरिती अवतार नाना ॥
ते काय आतळती जन्ममरणा । मिथ्या कल्पना या दोन्ही ॥ ५४ ॥

देहपाता आधींच देख । जणें देहाची केली राख ॥
तयास मरणाचा कायसा धाक । मरण हें खाक जयापुढें ॥ ५५ ॥

मरण ही देहाची प्रकृति । मरण ही देहाची सुखस्थिति ॥
जीवन ही देहाची विकृति । विचारवंतीं विचारिजे ॥ ५६ ॥

साईसमर्थ आनंदघन। गर्वे न जया देहाचें जनन ॥
तयाच्या देहास कैसें मरण। देहस्फुरण वर्जितते ॥ ५७ ॥

साई परब्रह्म पूर्ण। तयां कैचें जन्ममरण ॥
ब्रह्म सत्यत्वें जगन्मिथ्यापण। देहाचें भान कैचें त्यां ॥ ५८ ॥

प्राणधारण वा विसर्जन। अलक्ष्य रूपें परिभ्रमण ॥
हें तों स्वच्छंदयोगक्रीडन। भक्तोद्धारण निमित्तें ॥ ५९ ॥

म्हणती रवीस लागलें ग्रहण। झाला कीं हो खग्रास पूर्ण ॥
हा तो केवळ दृष्टीचा दोषगुण। संतांसीं मरण तैसेंच ॥ ६० ॥

देह ही केवळ उपाधी। तयां कैची आधिव्याधि ॥
असल्या कांहीं प्रारब्धानुबंधीं। तयाची न शुद्धि तयांला ॥ ६१ ॥

भक्त पूर्वार्जितीं जो संचला। अव्यक्तरूपी भक्तीं भरला ॥
तोहा भक्त कैवारार्थ प्रकटला। शिरडींत दिसला तेव्हांच ॥ ६२ ॥

आतां भक्तकार्यार्थ संपला। म्हणून म्हणती देह ठेविला ॥
कोण विश्वासील या बोला। मती योग्याला काय हे ॥ ६३ ॥

इच्छामरणी साई समर्थ। देह जाळिला योगाग्नींत ॥
स्वयें समरसले अव्यक्तांत। भक्तहृदयांत ते ठेले ॥ ६४ ॥

जयाचें केवळ नामस्मरतां। जन्ममरणाची नुरे वार्ता ॥
तयास कैची मरणावस्था। पूर्वील अव्यक्तता तो पावे ॥ ६५ ॥

उल्लंघोनी जडस्थिति। बाबा समरसले अव्यक्तीं ॥
तेथेंही भोगिती स्वरूपस्थिति। सदां जागविती भक्तांतें ॥ ६६ ॥

सचैतन्य जो मुसमुसला। भक्तहृदयीं जो अढळ ठसला ॥
तो देहकाय म्हणावा निमाला। बोल हा मनाला मानेना ॥ ६७ ॥

म्हणोनि हा अनाद्यनंत साई। अभंग राहील विश्वमळयीं ॥
जन्ममरणादिया अपायीं। न कदांही पडेल ॥ ६८ ॥

महाराज ज्ञानोबा काय गेले । तीन शतकांतीं दर्शन दिधलें ॥
नाथ महाराज येऊन आले । उपकार केले जगावर ॥ ६९ ॥
जैसे ते नाथ कृपावंत । पैठणीची जाहली ज्योत ॥
तुकाराम महाराज देहूंत । आळंदींत नरसिंहसरस्वती ॥ ७० ॥
समर्थ रामदास परळींत । अक्कलकोटकर अक्कलकोटींत ॥
प्रभुमाणिक हुमणाबादेंत । साई हे शिरडींत वैसेच ॥ ७१ ॥
जथा मनीं जैसा भाव । आजही तया तैसा अनुभव ॥
हा सिद्धचि जयाचा प्रभाव । मरण भाव कैचा त्या ॥ ७२ ॥
तो हा भक्तकाज कैवारी । देह ठेविला शिरडीभीतरीं ॥
स्वरूपें भरलासे चराचरीं । लीलावतारी समर्थ ॥ ७३ ॥
आतां काय आहे शिरडींत । समर्थ झाले ब्रह्मीभूत ॥
ऐसी न शंका यावी मनांत । मरणातीत श्रीसाई ॥ ७४ ॥
संत मुळींच गर्भातीत । परोपकारार्थ प्रकट होत ॥
ब्रम्हस्वरूप मूर्तिमंत । भाग्यवंत अवतरती ॥ ७५ ॥
जन्म आणि मरणस्थिती । अवतारीयां कदा न ये ती ॥
कार्यं सरतां ते स्वरूपीं मिळती । समरसती ते अव्यक्तीं ॥ ७६ ॥
अवघा देह साडेतीन हात । बाबा काय त्यांतचि समात ॥
ते विशिष्ट वर्ण स्वरूपयुक्त । हें तो अयुक्त बोलणें ॥ ७७ ॥
अणिमागरिमादि अष्टसिद्धि । आलिया गेलिया क्षयनावृद्धि ॥
स्वयेंच अखंड जयाची समृद्धि । ऐसी प्रसिद्धि तयांची ॥ ७८ ॥
ऐसिया महानुभावांचा उदय । लोककल्याण हाच आशय ॥
उदयास आहे स्थिति विलय । लोकसंग्रहमय संत ॥ ७९ ॥
जन्मभ्रांति मृत्युभ्रांति । आत्मैकत्व अविनाश स्थिति ॥
स्वप्नाआजील सुखसंपत्ति । तेच परिस्थिति तयांची ८० ॥

१ एकनाथ महाराज.

ना तरी जो ज्ञान नि ान । सदैव जया आत्मानुसंधान ॥
तयास देहाचें जोप न । आणीक पतन सारिखें ॥ ८१ ॥

असो पडलें बाबां शरीर । कोसळला दुःखाचा डोंगर ॥
हाहाकार शिरडीभर । एकचि कहर उसळला ॥ ८२ ॥

ऐकूनि बाबांचें निर्याण । वार्ता खोंचली जैसा बाण ॥
पडलें नित्य व्यवसाया खाण । दाणादाण उडाली ॥ ८३ ॥

पसरतां ती अमंगल मात । सकळांस गपला वज्राघात ॥
विचारी बैसले निवांत । इतरीं आकांत मांडिला ॥ ८४ ॥

अति आवडीचेनि पडिभारें । कंठ तयांचा दाटे गहिंवरें ॥
दुःखाश्रनीर नयनीं पाझरे । 'शिवशिव हरे' उद्‌गारले ॥ ८५ ॥

घरोघरीं झाली हडबड । उडाली एकची गडबड ॥
छातींत भरली धडधड । लोक दडदड धांविन्नले ॥ ८६ ॥

महाराजांचें देहावसान । प्राणांतचि ओढवला ग्रामस्थांपूर्ण ॥
म्हणती देवा हा प्रसंग दारूण । हृदयविदारण झालें गा ॥ ८७ ॥

जो उठे तो पळत सुटे । मशीद मंडप गच्च दाटे ॥
अवस्था पाहोनि हृदय फाटे । कंठ दाटे दुःखानें ॥ ८८ ॥

गेलें शिरडीचें वैभव सरलें । सुख सौभाग्य सर्व हारपलें ॥
डोळे सर्वांचे अश्रूनीं भरले । धैर्य भंगलें सकळांचें ॥ ८९ ॥

काय त्या मशिदीची महती । सप्तपुऱ्यांत जीची गणती ॥
द्वारकामाई जीस म्हणती । बाबा निश्चिती सदैव ॥ ९० ॥

असो निर्याण, निर्वाण वा निधन । द्वारका सायुज्य मुक्तीचें स्थान ॥
जया ईश्वरीं नित्यानुसंधान । तया अवस्थान ये ठायीं ॥ ९१ ॥

तो हा गुरुराज साईराय । भक्त कनवाळू बाप माय ॥
भक्तां विश्रांतीचा ठाय । आठव होय नित्याची ॥ ९२॥ ॥

बाबांवीण शिरडी ओस। दाही दिशा शून्य उदास॥
प्राण जातां जे शरीरास। कळा शिरडीस ते आली॥ ९३॥
सुकोनि जातां तळ्यांतील जीवन। तळमळती जैसे आंतील मीन॥
तैसे झाले शिरडीचे जन। कलाहीन उद्विग्न॥ ९४॥
कमलावीण सरोवर। पुत्रावीण शून्य घर॥
कीं दीपावीण मंदीर। मशीद परिसर तो तेवी॥ ९५॥
कीं घरधन्यावीण घर। कीं राजयावीण नगर॥
कीं द्रव्यावांचून भांडार। शिरडी कांतार[1] बाबाविणें॥ ९६॥
जननी जैसी अर्भका। किंवा मेघोदक चातका॥
तेंच प्रेम शिरडीचे लोकां। आणिक भक्तां सकळीकां॥ ९७॥
शिरडी झाली कलाहीन। मृतप्राय हीन दीन॥
जीवनेवीण जेवी मीन। तेवी जन तळमळती॥ ९८॥
वर्जितां कांता निज भ्रतारें। अथवा माता स्तनींचीं पोरें॥
जैसीं गाईचीं चुकलीं वासरें। लहान थोरें त्यापरी॥ ९९॥
अनिवार हे दुःखावस्था। झाली शिरडीच्या जनां समस्तां॥
बिदो बिदीं अस्तावेस्ता। जन चौरस्ता धांवती॥ १००॥
साई मुळेंच शिरडी पवित्र। साईमुळेंच शिर्डीचें चरित्र॥
साई मुळेंच शिरडी क्षेत्र। साईच छत्र सर्वांतें॥ १०१॥
कोणी करी आक्रंदन। कोणी तेथें घेई लोळण॥
कोणी पडे मूर्छापन्न। दुःखापन्न जन झाले॥ १०२॥
दुःखाश्रूनीं स्रवती नयनं। नरनारी अति उद्विग्न॥
टाकोनियां अन्नपान। दीनवदन तीं झालीं॥ १०३॥
पाहोनी बाबांची ते अवस्था। ग्रामस्थांसी परमावस्था॥
आबालवृद्धा भक्तां समस्तां। महदस्वस्थता पातली॥ १०४॥

१ अरण्य.

जेथें गोड कथा सुरस । जेथें रोज आनंद बहुवस ॥
जेथें शिरावया न मिळे वाव । ते मशीद उद्वस तंव दिसे ॥ १०५ ॥

नित्य श्री नित्यमंगळ । होती जी शिरडी पूर्वी सकळ ॥
बाबाच एक कारण मूळ । तेणें हळहळ ग्रामस्थां ॥ १०६ ॥

आनंदकंदा आनंद विग्रहा । भक्त कार्यार्थ धरिलें देहा ॥
तो अर्थ संपादून अहाहा । नगरी विदेहा पावलासी ॥ १०७ ॥

अष्टौप्रहर निरालस । कळकळीचा हितोपदेश ॥
करीतसां कीं रात्रंदीस । बुद्धिभ्रंश आम्हा तैं ॥ १०८ ॥

जैसें उपडी घड्यावर पाणी । उपदेश तैसा आम्हां लागुनी ॥
गेला वरचे वर वाहुनी । बिंदुही ठिकाणीं लाधेना ॥ १०९ ॥

" तुम्ही कोणास बोलतां उणे । मजला तात्काळ येतें दुखणें " ॥
पदोपदीं हें अपुलें सांगणें । परी न मानणें तें आम्ही ॥ ११० ॥

ऐसे अपुले अपराधी किती । मानिली नाहीं ज्यांनीं ही सदुक्ति ॥
त्यांची आज्ञाभंग निष्कृति । एणेरीती फेडिली का ॥ १११ ॥

बाबा त्या सकळांचें पाप । त्याचें भरलें काहें माप ॥
आतां होऊन काय अनुताप । भोगावें आपाप भोक्तृत्व ॥ ११२ ॥

तेणेंच आम्हांतें कंटाळलां । तरीच का पडदा आड झालां ॥
आम्हांवरी हा अवचित घाला । काळें घातला कैसा कीं ॥ ११३ ॥

कानीं कपाळीं ओरड करितां । कंठास तुमचे कोरड पडतां ॥
कंटाळलां वाटतें चित्ता । अमुची उदासता देखोनी ॥ ११४ ॥

म्हणोनी अम्हांवरी रुसलां । पूर्वप्रेम सारें विसरलां ॥
कीं ऋणानुबंधचि आज सरला । कीं ओसरला स्नेहपान्हा ॥ ११५ ॥

आपण इतुके सत्वर जाते ॥ ऐसें जरी आधीं समजतें ॥
तरी फारची बरवें होतें । सावध राहते जन आधीं ॥ ११६ ॥

ाम्ही सकळ सुस्त राहिलों । झोंपा घेत स्वस्थ बैसलों ॥
ंतेर हे ऐसे फसलों । असलों नसलों सारखे ॥ ११७ ॥

ालों आम्ही गुरुद्रोही । वेळीं कांहींच केलें नाहीं ॥
स्थ बसावें तरी तेंही । घडलें नाहीं आम्हांतें ॥ ११८ ॥

ांव लांबून शिरडीस जावें । तेथेंही चकाट्या पिटीत बसावें ॥
ार्यास आलों हें समूळ विसरावें । तेथेंही आचरावें यथेच्छ ॥ ११९ ॥

ंत-हेचे भक्त अनेक । ज्ञानी अभिमानी भावार्थी तार्किक ॥
या सद्रूपें अवघे एक । नेणे न्यूनाधिक्य जो भेद ॥ १२० ॥

ाीं भगवंतावाचून । दृष्टी न ज्याच्या पदार्थ आन ॥
सें जयाचें देखणेपण । जो न आपणही दुजा ॥ १२१ ॥

क्त हेही स्वयें ईश्वर । मी गुरू ही नव्हे इतर ॥
भयांस स्वस्वरूप विसर । भेद हे परस्पर त्या योगें ॥ १२२ ॥

स्तुत: ईश्वरचि आहों आपण । परी परमार्थ स्वरूप विस्मरण ॥
न मुख्य भेदाचें लक्षण । अध:पतन तें हेंच ॥ १२३ ॥

ार्वभौमास्वप्न होई । भिक्षार्थ दारोदारीं जाई ॥
ेन बोधाची जाग येई । अवलोकी ठायींच आपणा ॥ १२४ ॥

वृत्ती ही जी जागृती । तीच निवृत्ति स्वप्नस्थिती ॥
री जागृती निजानुभूती । पूर्ण अद्वैतीं समरसणें ॥ १२५ ॥

ानी अज्ञानी सर्व आश्रित । सर्वांवरी प्रेम अत्यंत ॥
ीवाहूनि मानी आप्त । भेद ना तेथ यत्किंचित ॥ १२६ ॥

नुष्यरूपें देवची होते । जरी हें आणिलें प्रचीतीतें ॥
री त्यांचिया लडिवाळतेतें । बळी पडले ते समस्त ॥ १२७ ॥

ोणास दिधली धनसंपत्ति । कोणास संसारसुख संतती ॥
णें महान पडली भ्रांती । ज्ञान मातीस आंचवले ॥ १२८ ॥

कधीं जयासवें हांसत । तयां अंगीं अभिमान दाटत ॥
कीं तयावरीच प्रेम अद्भूत । इतरां न दावित तें तैसें ॥ १२९ ॥

तेंच कोणा क्रोधें वदतां । म्हणती न तो तयां आवडता ॥
आम्हा विशींच अधिक आदरता । इतरां न देतात तो मान ॥ १३०

ऐसेच आम्ही नंबर लावितां । बाबांच्या तें स्वप्नीही नसतां ॥
उगाच नागवलों निजस्वार्था । कृतकर्तव्यता विसरलों ॥ १३१ ॥

परब्रह्म सगुण मूर्ति । दैवें असतां उशागती ॥
खऱ्या कार्याची होऊनि विस्मृती । विनोदीं प्रीति धरियेली ॥ १३२

येतांच बाबांचें दर्शन घ्यावें । फळफूल अवघें समर्पावें ॥
दक्षणा मागतां मग कचरावें । नच रहावें ते ठायीं ॥ १३३ ॥

सांगतां हितवादाच्या गोष्टी । पाहुनी आमुची क्षुद्र दृष्टी ॥
झालां वाटतें खरेंच कष्टी । गेलां उठाउठी निजधामा ॥ १३४ ॥

आतां ती आपुली स्वानंदस्थिति । पुनश्च का हे नयन देखती ॥
गेली हरपली ती आनंद मूर्ती । जन्मजन्मांतीं अदृश्य ॥ १३५ ॥

हा हा दारुण कर्म देखा । अंतरला ठाईंचा साई सखा ॥
निर्हेतुक दयार्द्र तया सारिखा । झाला पारखा आम्हांसी ॥ १३६ ॥

'बरें नव्हे कोणातें छळणें । तेणें येतें मजला दुखणें' ॥
मना नागिलें हें बाबांचें म्हणणें । केलीं भांडणें यथेच्छ ॥ १३७ ॥

छळ करितां भक्ताभक्तां । आम्ही मुकलों कीं साईनाथा ॥
होतो तयाचा अनुताप आतां । आठवती वार्ता तयांच्या ॥ १३८ ॥

आठा वर्षांचा बाळजनीं । प्रगट होईन मी मागुतेनी ॥
ऐसें महाराज भक्तां लागुनीं । आहेती सांगुनी राहिले ॥ १३९ ॥

आहे ही संताची वाणी । वृथा मानूं नये कोणी ॥
कृष्णावतारीं चक्रपाणी । केली करणी ऐसीच ॥ १४० ॥

ऽ वर्षाचीं सुंदर कांती । चतुर्भूज आयुधें हातीं ॥
ी पुढें बंदीशाळेप्रति । कृष्णमूर्ती प्रकटली ॥ १४१ ॥

कारण भूभारहरण । येथें दीन भक्तोद्धारण ॥
किमर्थ शंका जनन । अतर्क्य विंदान संतांचें ॥ १४२ ॥

काय एका जन्माचा निर्बंध । बहात्तर पिढ्यांचा ऋणानुबंध ॥
ांचा बाबानीं पूर्व संबंध । कथानुबंध कथियेला ॥ १४३ ॥

बांधुनीं प्रेम फांसा । वाटती महाराज गेले प्रवासा ॥
ल मागुतेनी हा पूर्ण भरंवसा । भक्त मानसा झालासे ॥ १४४ ॥

ात्कार कित्येकांसी । दृष्टांतानुभव बहुतेकांसी ॥
त्कार तों अनेकांसी । गुप्त रूपेंसीं दाविती ॥ १४५ ॥

ात्विक गुप्त असती । भक्तांभाविकां ठाईंच दिसती ॥
ी जयाची चित्तवृत्ति । तैसीच अनुभूति रोकडी ॥ १४६ ॥

ाडींत गुप्त रूप । मशीदींत ब्रह्मरूप ॥
ाधींत समाधी रूप । सुखस्वरूप सर्वत्र ॥ १४७ ॥

ो सांप्रत हाच विश्वास । भक्तीं धरावा निज जीवास ॥
नाहीं समर्थ साईस । अक्षय रहिवास अखंड ॥ १४८ ॥

जाती निजधामाप्रति । संतां ठायींच ब्रह्मस्थिति ॥
नागमन ते नेणती । समरसतीं आनंदीं ॥ १४९ ॥

ोन आतां हेच विनंती । नम्रपूर्वक करितों प्रणति ॥
ना थोरां अवघियां प्रती । सादर चित्तीं अवधारा ॥ १५० ॥

ो उत्तम श्लोकसंगति । गुरू चरणीं निष्काम प्रीति ॥
गुणानु कथना सक्ति । निर्मल भक्ति प्रकट हो ॥ १५१ ॥

ो प्रीति अनवच्छिन्न । न होत स्नेहपाश भिन्न ॥
ोत भक्त सुखसंपन्न । रात्रंदिन गुरू पदीं ॥ १५२ ॥

असो पुढें त्या देहाचें उचित । करावें काय तें निश्चित ॥
येच विचारीं जन समस्त । शिष्य ग्रामस्थ लागले ॥ १५३ ॥

श्रीमंत बुट्टी मोठे भावुक । जणूं या पुढील भविष्याचें स्मारक ॥
टोलजंग वाडा सुखकारक । बांधून स्थाईक ठेविला ॥ १५४ ॥

मग पुढें तें कलेवर । कुठें असावें या विषयांवर ॥
होऊनि छत्तीस तास विचार । घडलें होणार जें होतें ॥ १५५ ॥

एक म्हणे या कलेवरासीं । स्पर्शूं न द्यावें आतां हिंदूंसीं ॥
मुसलमानांच्या कबरस्थानासी । समारंभेसीं नेऊंया ॥ १५६ ॥

दुजा म्हणे हें कलेवर । ठेवावें नेऊन उघडयावर ॥
थडगें एक बांधावें सुंदर । तयांत निरंतर राहावें हें ॥ १५७ ॥

खुशालचंद अमीर शक्कर । यांचाही होता हाच विचार ॥
परी वाडियांत पडो हें शरीर । होते हे उद्गार बाबांचे ॥ १५८ ॥

पाटील रामचंद्र मोठे करारी । तेही एक ग्रामाधिकारी ॥
बाबांचे प्रेमळ सेवेकरी । वदती ते गांवकरियांसीं ॥ १५९ ॥

असोत तुमचे विचार कांहीं । समूळ आम्हातें मान्य नाहीं ॥
वाड्या बाहेर इतरां ठायीं । क्षणभरिहि साई ठेवूं नये ॥ १६० ॥

हिंदू आपुले धर्मानुसार । मुसलमानही तैसाच विचार ॥
योग्यायोग्य चर्चा प्रकार । सबंध रात्रभर जाहलें ॥ १६१ ॥

इकडे लक्ष्मण मामा घरीं । असतां पहांटे निद्रेच्या भरीं ॥
बाबा तयांच्या धरूनि करीं । म्हणाले "झटकरी उठ चल" ॥ १६२ ॥

"बापूसाहेब न येणार आज । मी मेलों हा तयाचा समज ॥
"तूं तरी काकड आरती मज । करी पूजन समवेत" ॥ १६३ ॥

तात्काळ नित्य क्रमानुसार । सर्व घेऊन पूजासंभार ॥
लक्ष्मण मामा आले वेळेवर । पूजेसि सादर जाहले ॥ १६४ ॥

१६५ ते १८५ पर्यंतच्या ओव्या
नाहीत अध्याय अपूर्ण आहे

१८२६

५०८

श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

मासिक पुस्तक.

वर्ष ४ थें] पौष-माघ शके १८४८ [अंक ११ ते १२

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम् ॥



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ॥

श्री शंकराचार्य.

संपादकः—लक्ष्मण गणेश महाजनी.

प्रकाशकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.

श्री साईलीला कचेरी ५ टर्नर रोड बांद्रे, बी. बी. रेल्वे.

# अनुक्रमणिका.


| | |
|---|---|
| स्फुट विषय. ... ... ... ... ... | ५०९–५४८ |
| महाराजांचे अनुभव ... ... ... ... | ५६३–५७८ |
| श्री साईसच्चरित ... ... ... ... | ७४३–७५८ |


## वर्गणीचे दर.

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनीआर्डरीनें आगाऊ रु. ३।=. व्ही. पी. नें रु. ३॥ फुटकळ अंक ।=. मागील अंकास शिल्लक असल्यास -॥-

## शिरडी येथील शाके १८४९ सालच्या रामनवमीच्या उत्सवाचा कार्यक्रम.

चै. शु. ८ ( ९–४–२७ ) शनिवार–उत्सवास आरंभ.

चै. शु. ९ ( १०–४–२७ ) रविवार–श्रीरामजन्मोत्सव संध्याकाळीं रथाची व निशाणाची मिरवणूक.

चै. शु. १० ( ११–४–२७ ) सोमवार–कीर्तन, कुस्त्या, दारुकाम.

चै. शु. ११ ( १२-४-२७ ) मंगळवार–कीर्तन, पालखीची मिरवणूक.

चै. शु. १२ ( १३–४–२७ ) बुधवार–गोपालकाला व तीर्थप्रसाद.

या उत्सवास श्री. पावलेगांवकर नरसिंह बाबा महाराज येणार आहेत. तरी सद्भक्तांनीं व भाविकांनीं श्रींचे तीर्थप्रसादास आपल्या मित्रमंडळींसह अवश्य येण्याचें करावें.

शिरडी संस्थानतर्फे
सकल संतांचा चरणरज
दासगणु

# शोचनीय मृत्यु

आम्हांस कळविण्यास वाईट वाटतें कीं साईभक्तांच्या पूर्ण परिचयाचे ह. भ. प. सखाराम हरी ऊर्फ बापूसाहेब जोग हे साकोरी–उपासनी नगर-येथें ब्रह्मीभूत झाले. आम्हीं ब्रह्मीभूत म्हणतों याचें कारण बापूसाहेबांना संन्यास देण्यांत आला होता. गेल्या ४।५ महिन्यापासून बापूसाहेब आजारीच होते. अंतकाळीं बापूसाहेबांचें वय ७० च्या आसपास असावें असा आमचा अदमास आहे.

बापूसाहेब जातीनें चितपावन कोंकणस्थ ब्राह्मण होते. पुण्यांतील प्रसिद्ध सत्पुरुष ह. भ. प. विष्णुबोवा जोग हे बापूसाहेबांचे चुलत पुतणे होते. यावरून या जोग घराण्याला सत्पुरुषांचा संस्कार बराच पूर्वीं झालेला दिसतो. स्वतः बापूसाहेबांनाही शिरडीस येण्यापूर्वीं सत्समागम झालेला होता. ठाणें जिल्ह्यांत भिवंडी, वाडे वगैरे ठिकाणीं नौकरीवर असतांना कवाड येथील साधु सखाराम महाराज, यांच्या संस्थानांत ते कांहीं दिवस जाऊन राहिले होते. पेन्शन घेतल्यावर कवाडास श्री सखाराम महाराजांचे संस्थानांत कायमचा राहण्याचा आपला विचार होता असें बापूसाहेब सांगत असत. शिरडीस साठेसाहेबांचे वाड्यांत ते राहात असत व कित्येक वेळां त्यांना तेथें कांहीं उपसर्ग पोहोंचला म्हणजे ते महाराजांकडे येऊन आम्हांला जाण्याची परवानगी द्या, आम्हीं कवाडास जाऊन राहतों असें म्हाणणें करीत. अर्थात महाराजांनीं त्यांना शिरडीस ठेवून घेतलें होतें तें जाऊं देण्याकरितां थोडेंच होतें. "वाडा काय साठेसाहेबांच्या बापाचा आहे, मी दादांना ( साठेसाहेबांचे सासरे जे त्याच वाड्यांत राहात असत त्यांना ) बोलेन, तुम्हीं तेथें खुशाल राहा," अशा गोड शब्दांनीं महाराज त्यांची समजूत घालीत.

बापूसाहेब सरकारी नौकरींत सुपरव्हाईजरच्या हुद्यावर होते. १९०९ सालीं त्यांनीं पेन्शन घेण्याच्या पूर्वीची ( रिटायरिंग फर्लो ) रजा घेतली व कुटुंबासह ते शिरडीस महाराजांच्या दर्शनाला आले. त्याच खेपेला दोघांना महाराजांनीं कायमचें शिरडीस ठेवून घेतलें. सामान सुमान आणण्याकरितां सुद्धां त्यांना शिरडींतून जाऊं दिलें नाहीं. बापूसाहेबांना मूलबाळ नव्हतें. कुटुंबांत दोघेच जण. सर्व संसार व्यवस्थित होऊन पेन्शन घेतल्यावर कोठेंतरी " हरि हरि " करीत कालक्षेप करावयाचा. अशावेळीं महाराजांनीं त्यांना ठेवून घेतलें व त्यांचेंही मन महाराजांच्या चरणीं समरस होऊन त्यांनीं शिरडीस कायमची वस्ति केली हें योग्यच झालें.

बापूसाहेबांची राहणी जुन्या पद्धतीची व शास्त्रोक्त गृहस्थाश्रमी-धर्माची होती. कर्मनिष्ठ व सत्वशील ब्राह्मणाचे ते एक उत्कृष्ट आदर्श होते. त्यांचें कुटुंब सौ. ताई, ज्यांना महाराज " आई " या नांवानें संबोधित असत, त्या बापूसाहेबांना शोभेलशा त्यांच्या अर्धांगी होत्या. उत्कट भगवद्भक्ति, पति-निष्ठा, संसारांतील दाक्षिण्य हे त्यांचे विशिष्ट गुण होते. बापूसाहेब व सौ. ताई या जोडीकडे पाहिलें म्हणजे कोणाच्याही मनांत उभयतांबद्दल सात्विक आदर वाटल्याशिवाय राहात नसे. दोघांची महाराजांचे ठिकाणीं पूर्ण निष्ठा होती. त्यांचा बहुतेक काळ महाराजांचे सेवेंत वेंचत असे. सौ. ताईंची निष्ठा इतकी जाज्वल्य होती कीं, महाराजांनीं देह ठेविल्यावर त्यांना अगदीं चैन पडेनासें झालें. लवकरच त्या विरक्त झाल्या व पुढें भ्रमिष्ट होऊन थोड्याच कालांत साईपदीं लीन झाल्या.

बापूसाहेब श्री दत्तोपासक होते. पण ही त्यांची उपासना प्रामुख्यानें बाहेर दिसून येत नसे. त्यांच्या देव्हाऱ्यांत श्री दत्तात्रयाप्रमाणें इतर देवांच्या-ही मूर्ति होत्या. दत्तजयंतीला दत्ताच्या मूर्तिला कफनी अर्पण करण्याचा त्यांचा

नियम असे. शिरडीस आल्यावर एके साली दत्तजयंतीला घरांतील मूर्तिप्रमाणें महाराजांनाहि एक कफनी समर्पण करावी अशी त्यांना इच्छा झाली. त्याप्रमाणें महाराज वापरीत असत त्याच तऱ्हेची एक कफनी महाराजांच्या बाळा शिंप्याकडून त्यांनीं शिवबून घेतली, व ती महाराजांना दत्तजयन्तीला अर्पण केली. महाराजांनीं पूजेचा व कफनीचा स्वीकार केला व बापूसाहेबांना आपली एक कफनी उलट प्रसाद म्हणून दिली. ही कफनी पुढें बापूसाहेब संध्याकाळीं महाराजांचे दर्शनाला जातेवेळीं अंगांत घालीत असत. ही कफनी, वर उपर्णे व डोक्याला शुभ्र रुमाल या वेषाला बापूसाहेब "दरबारी पोषाख" म्हणत व विशिष्टप्रसंगीं ते हाच पोषाख करीत. एऱ्हीं त्यांची पोषाखाची तऱ्हा अगदींच साधी असे. प्रथम ते कांहीं दिवस वस्त्रप्रावर्णांचा उपयोग करीत असत; परंतु पुढें त्यांनीं त्या सर्वांचा त्याग केला व फक्त एक अंगवस्त्रच ते जवळ बाळगीत असत. थंडी असल्यास तें अंगावर पांघरावयाचें किंवा त्यालाच उबेकरितां घाबळी जोडावयाची, एऱ्हीं बगलेखालून अंगावर घ्यावयाचें. फक्त संध्याकाळीं व चावडीच्या वेळीं, वर निर्दिष्ट केलेला आपला "दरबारी पोषाख" ते अंगावर चढवीत.

स्वभावानें बापूसाहेब मूळचे बरेच तामसी वृत्तीचे होते. अधिकाराचें काम केलेलें, त्यांत मजूरवर्गाशीं त्यांचा विशेष संबंध येत असे त्यामुळें स्वभाव बराच रागीट बनला होता. परंतु शिरडीस राहूं लागल्यापासून त्यांच्या वृत्तींत बदल होत होत त्यांची तामसी वृत्ति पार मावळली. दिसण्यांत जरी बापूसाहेब उग्र व रागीट दिसत तरी अंतःकरणाचे ते फार कोमल व सदय होते. त्यांचें सरोस सर्वांशीं पटत नसे. रिकाम्या पाटीलक्या करणें त्यांच्या स्वभावाला आवडत नसे. आपण बरें कीं आपलें काम बरें हीच वृत्ति त्यांची नेहमीं असे. महाराजांकडे सुद्धां ठराविक वेळां शिवाय बोलावणें आलें तरच

ते जात असत. ज्या वेळचें काम त्या वेळीं करणें हा एक त्यांचा विशिष्ट गुण होता.

बेताबाती खर्च करून पण व्यवस्थितपणें राहावयाचें हा कोंकणस्थांतील गुण बापूसाहेबांचे राहणींत दृष्टोत्पत्तीस येत असे. साहजिकच अशा रीतीनें द्रव्य संचय होतो. परंतु हा द्रव्य लोभही महाराजानीं बापूसाहेबांच्या मनांतून काढून टाकला. शिलकेंत असलेले सर्व रुपये महाराज दक्षिणेच्या रूपानें मागून घेऊं लागले, तेव्हां पुढें बापूसाहेब आपण होऊनच पेन्शनांतील शिल्लक राहिलेले सर्व पैसे महाराजांना देऊं लागले. कोपरगांवाहून पेन्शन आणलें कीं प्रथम गांवांतील सर्व देणें देऊन टाकून राहिलेले पैसे महाराजांपुढें नेऊन ठेवावयाचे व दर्शन घेऊन घरीं येऊन कपडे उतरावयाचे हा त्यांचा क्रम असे. कित्येक वेळां महाराज त्या पैशाचा स्वीकार करीत व कित्येक वेळां "बापूसाब हे तुमच्या जवळच ठेवा" म्हणून सांगत व बापूसाहेब आज्ञा होईल त्या प्रमाणें करीत. परंतु जरी पैसे घरीं आणले तरी ती महाराजांची ठेव आपल्याजवळ आहे ही भावना त्यांचे मनांत असे. पुष्कळ वेळां महाराज आपले पैसे बापूसाहेबांजवळ ठेवण्याकरितां देत असत. महाराजांचा स्वभाव विनोदी असे. कित्येक प्रसंगीं त्यांनीं बापूसाहेबांजवळ ठेवण्याकरितां जर १०० रुपये दिले तर ४ दिवसानीं त्यांचेकडे १२५ रुपये मागावे व मी तुमच्या जवळ १२५ रुपयेच दिले होते असें थट्टेनें म्हणावें. दोन चार वेळां असें झालें तेव्हां बापूसाहेबांनीं महाराजांना एकदा सांगितलें कीं, "बाबा ही तुमची पैशाची भानगड मला नको. तुम्हीं आपले दुसरे कोणापाशीं ठेवायला देत जा" तेव्हां महाराज म्हणाले, "बापुसाब असे रागावूं नका. मी चुकलों असेन. शंभरच रुपये दिले बरें. ठेवा आतां ते." एकदा कोणी भक्तानें महाराजांना एक गिनी दक्षिणा दिली. महाराजानीं ती बापूसाहेबांचे हातांत ठेवून हें काय आहे म्हणून विचारलें. बापूसाहेबांनीं ती

गिनी आहे व तिचे १५ रुपये मिळतात म्हणून सांगितलें. महाराज म्हणाले, "तिची किंमत ३० रुपये येते. बापूसाहेब म्हणत १५ येते. महाराज म्हणाले ३० रुपये येतात. तुम्हीं ही ठेऊन आम्हांला तीस रुपये द्या. असा विनोद किंत्येक प्रसंगीं महाराज बापूसाहेबांपाशीं करीत असत.

महाराजांची विशिष्ट कामगिरी बापूसाहेबांकडे असे ती आरतीची आरती प्रथम सुरू झाली ती ह. भ. प. *मेघाच्या हातून. सन १९१२ सालीं मेघाचे मृत्युनंतर महाराजांची आरती धरण्याचा मान बापूसाहेबांना मिळाला व महाराजांनीं देहविसर्जन केल्यावर २-३ वर्षांनीं बापूसाहेब साकोरीस राहाण्यास गेले तेथपर्यंत तो त्यांचेकडेच होता. त्यांची ती भव्य गौर काय यष्टि, रुबाबदार मुद्रा, ब्रह्मनिष्ठेचें तेज व पीतांबर परिधान करून सोवळ्यानें करीत असलेली महाराजांची आरती या सर्व आठवणी त्यांचें नांव ऐकल्यावर प्रत्येकाचे मनांत जागृत होतील. महाराजांच्या ऐश्वर्याला शोभतील असे महाराजांच्या दरबारांतील बापूसाहेब एक प्रमुख सेवेकरी होते.

ह. भ. प. मेघाचे काळांत ज्याप्रमाणें दिवसा महाराजांची आरती मशिदींत होत असे तशी रात्रीची आरती साठेसाहेबांचे वाड्यांत मेघानें ठेविलेल्या महाराजांच्या मोठ्या तसबिरीची होत असे. या दोन्ही आरत्या मेघाच करीत असे व दिवसाप्रमाणें रात्रीच्या आरतीला ही सर्व भक्तिमंडळी जमत असत. मेघा वारल्यानंतर जशी मशीदींतील आरती बापूसाहेबांकडे आली तशीच रात्रीची तसबिरीची आरतीही त्यांचेकडेच आली व कांहीं कालपर्यंत ही संध्याकाळची आरतीही थाटांत होत असे. पुढें काकासाहेबांनीं वाडा बांधला त्यांत तसबिरीची स्थापना झाली व तेथेंही एक आरती संध्याकाळीं होऊं लागली. त्यामुळें मंडळी दुभागली. तरी पण साठेसाहेबांच्या

---

* हा एक शिवभक्त मारवाडी ब्राह्मण असे. याची कांहीं हकीकत पूर्वी श्री साईलीलेंत येऊन गेलेली आहे.

वाडयांतील आरतीला बरेंच भक्त जमत असत. नंतर तसबिरीसमोर उपासनी महाराजांच्या नेतृत्वाखालीं, महाराजांच्या पादुकांची स्थापना लिंबाचे* वृक्षाखालीं झाली. एकाच वाडयांत हें दुसरें देवस्थान झालें. याचें चालकत्व मुंबईकडील भाई नांवाचे एक गृहस्थ शिरडीस त्यावेळीं राहात असत त्यांच्या मंडळीकडे होतें. या मंडळींत दीक्षित नांवाचे एक तरुण भिक्षुक असत. ( हे हल्लीं साकोरीस असतात ) त्यांचेकडे पादुकांची पूजाअर्चा सोंपविली होती. पादुकांची संध्याकाळची आरती दुसऱ्या आरती प्रमाणें किंबहुना जास्तीच थाटानें होऊं लागली. व त्या बरोबर मेघाच्या तसबिरीच्या आरतीचें मान कमी पडूं लागले. त्याची अगाऊ सूचना महाराजांनीं एकदां मोठ्या गमतीनें दिली. दोन प्रहरीं बापूसाहेब महाराजांजवळ असतांना वरील दीक्षित तेथें गेले. त्यावेळीं दीक्षितांकडे बोटानें दाखवून महाराज प्रस्तुत लेखकाला म्हणाले "हा पाहिलास का ज्वान. तो म्हणतो बापूसाहेबांबरोबर मी कुस्ती खेळून बापूसाहेबाला पाडणार. नव्या दमाचा जवान गडी आहे पाडील खरा" अर्थात हें एक रूपक होतें व त्यांत सूचविल्याप्रमाणें पुढें दीक्षितांनीं आरतींत बापूसाहेबांना खरोखरच चीत केलें. बापूसाहेबांनीं मात्र कधीं एकटयानेंच अथवा कधीं एखाद दुसऱ्या मनुष्यासमवेत आपली आरती शेवटपर्यंत चालू ठेविली होती. पादुकांचें देवस्थान पुढें चांगलें भरभराटीला आलें होतें. त्रिकाळ पूजाअर्चा, दर गुरुवारीं भजन, वार्षिक उत्सव वगैरे थाटानें होत असे. परंतु पुढें दक्षिणाभिक्षा--संस्थेच्या अमदानींत हेंही बंद पडलें; कारण त्या संस्थेच्या चालकांनीं कांहीं मतभेद झाल्यामुळें, या मंडळींना वाडाच बंद केला. शिरडीस होणाऱ्या सर्व गोष्टी महाराजांच्या इच्छेनें होत असत व हल्लींही होतात, त्यांतलाच हा प्रकार झाला. महाराज कित्येकवेळां आगाऊ सूचना कशी देत असत त्याचें हें एक प्रत्यंतर ओघानें आलें म्हणून येथें नमूद केलें आहे.

* पूर्वीं एकेकाळीं महाराज या लिंबाखालीं बसत असत. जातीचा कडुलिंब असून त्याचीं पानें कडू लागत नाहींत.

कोणाच्या धार्मिक कल्पनेंत किंवा उपासनेत फेरबदल करावयाचा नाहीं, परंतु ज्याला त्याला आपआपल्या कल्पनेप्रमाणें धार्मिक बाबतींत वागूं द्यावयाचें व त्याची असेल तीच उपासना दृढ करवावयाची, हा जो एक महाराजांचा विशेष होता, त्याचें प्रत्यंतर बापूसाहेबांचे बाबतींत दिसून येत असे. बापूसाहेबांप्रमाणें महाराजांचे इतर कांहीं एकनिष्ठभक्त असत. त्यांपैकीं कित्येकांना महाराज आपल्या पंक्तीला भोजनास बसवीत असत. ही मंडळी सोंवळें न बाळगणारी अशी असत; परंतु बापूसाहेबांना मात्र महाराजांनीं आपल्या पंक्तीला केव्हांच घेतलें नाहीं. इतकेंच नव्हे तर प्रसादरूपानें सुद्धां कधींहि अन्नांश असलेला पदार्थ त्यांना दिला नाहीं. बापूसाहेब कर्मठ ब्राह्मण होते. त्यांचें सोंवळें बरेंच असे त्यांच्या या वृत्तीला महाराजही उत्तेजन देत असत. उलटपक्षीं जी ब्राह्मण मंडळी कर्मठपणानें न वागतां सोंवळ्या ओवळ्याचा निर्बंध मानीत नसत अशांना महाराज भोजनास आपल्या पंक्तीला घेऊन त्यांच्या त्या प्रवृत्तीला उत्तेजनच देत असत. अंतर्यामी जर सद्‌वृत्तीचा विकास होऊन प्रगति होत असेल तर या बाह्य साधनांना महाराज महत्व देत नसत. परंतु जो बाह्य साधनांना महत्व देईल त्याच्या आडही येत नसत. मात्र या दोन्हीं तऱ्हेची मंडळी फारच थोडी होती, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. बापूसाहेबांना निर्लेप प्रसाद महाराज इतका चारीत कीं कित्येक वेळां त्यांची कींव येत असे. बापूसाहेब आरतीला येत ती वेळ इतर भक्तमंडळींची पूजेची असे. नित्य नवी मंडळी दर्शनास येत व त्यांनीं आणलेल्या पेढें, बर्फी, फळफळावळ वगैरेंचा ढीग त्यावेळीं महाराजांपुढें पडलेला असे. महाराज स्वतः क्वचित त्यांतील कांहीं घेत असत. परंतु भक्तमंडळींत ते सर्व वाटून टाकीत. अशा वेळीं बापूसाहेबांवर एकदम ५।१० आंबे खाण्याचा किंवा अर्धा अर्धा शेर पेढे अथवा बर्फी खाण्याचा प्रसंग येई. बापूसाहेब आले कीं महाराज त्यांना हांका मारीत,व त्यांच्या हातावर पुष्कळशी बर्फी किंवा पेढे ठेवीतव " बापूसाब

खाऊन घ्या " म्हणून मागत. आंबे आपल्या हातानें मऊ करून "खाऊन घ्या" म्हणून बापूसाहेबांचे हातावर ठेवीत. अर्थात बापूसाहेबांना या सर्व वस्तु आज्ञेप्रमाणें कशातरी पोटांत रिचवण्यास लागत. सारांश कांहीं निवडक भक्तांना महाराज आपल्या पंक्तीला घेऊन सुग्रास भोजन घालीत, तर बापूसाहेबांसारख्या सोंवळ्या भक्ताला त्याला चालतील असे पदार्थ पोटभर घालीत.

शिरडींतील बापूसाहेबांचा नित्यक्रम त्यांच्या वृत्तीला साजेल असाच असे. उन्हाळा असो, पावसाळा असो, किंवा थंडी असो. सर्व ऋतूंत दोबें नवरा बायको पहाटें तीन वाजतां उठून काकासाहेब दीक्षितांच्या वाड्याचे मागें असलेल्या विहिरीवर स्नानास जात असत. त्यावेळीं याच विहिरीवर सर्वांचा वापर असे. नंतर घरीं येऊन रोजची संध्या, पूजा, अर्चा वगैरे करून कांकड-आरतीचे दिवशीं काकड्याला जात असत. कांकडआरती बापूसाहेबच करीत असत. कांकड्याला इतर मंडळी एखादे वेळीं उशीरां येत. परंतु बापूसाहेब आरतीचें साहित्य घेऊन वेळेवर हजर नाहींत असें कधींही झालें नाहीं. कांकड्याहून परत आल्यावर राहिलेलें ब्रह्मकर्म संपवून ते महाराजांकडे त्यांची न्याहरी संपण्याचे सुमारास जात असत. महाराजांबरोबर लेंडीवर जाऊन तेथें भगवद्गीतेचा पाठ करीत. महाराज परत आल्यावर आरतीची वेळ होई-पर्यंत बापूसाहेबांचा ज्ञानेश्वरी वाचण्याचा प्रघात असे. या वेळांत कित्येक मंडळींना महाराज दक्षिणा आणण्याचे निमित्तानें पण खरोखरी ज्ञानेश्वरी-श्रवणाकरितां बापूसाहेबांकडे पाठवीत. आरतीची घंटा झाल्यावर, बापूसाहेब ज्ञानेश्वरी आटोपून आरतीच्या तयारीनें मशिदींत जात व महाराजांची पूजा करून सर्व भक्तमंडळासमवेत ते महाराजांची आरती करीत. आरती झाल्यावर नैवेद्य काढण्याचा महाराजांचा प्रघात होता. त्यांत बापूसाहेब त्यांना मदत करीत असत. नैवेद्यापैकीं कांहीं ताटें महाराज बापूसाहेबांकरवीं दोन तीन ठिकाणीं पोहोंचवीत. नंतर सर्वांस उदी देऊन महाराज घरोघर जेवायला जा

म्हणून निरोप देत असत. त्यावेळीं शेवटीं उदी देऊन बापूसाहेबांना घरीं पाठवीत तेव्हां ते अतिथि समवेत भोजन करीत. दर्शनास आलेल्या मंडळींत कोणी कर्मठ ब्राह्मण असतील त्यांना महाराज प्रायः बापूसाहेबांकडे भोजनास पाठवीत. त्यामुळें बापूसाहेबांचे पंक्तीला नेहमीं दोनचार तरी अतिथि असत.

तिसऱ्या प्रहरीं एकनाथी भागवत वाचण्याचा बापूसाहेबांचा प्रघात असे. याहीवेळीं महाराज कित्येक भक्त मंडळींना, दक्षिणेच्या निमित्तानें किंवा पोथी ऐकण्या करितांच, बापूसाहेबांकडे पाठवीत असत. शिरडीस येणार मंडळी बहुतेक मुमुक्षु जनांपैकीं असे. त्यांतील कित्येकांच्या मनांत निरनिराळ्या धार्मिक शंका आशंका असत त्याचें निरसन पोथींत निघालेल्या विषयापासून झालें असें ते सांगत असत. या प्रमाणें बापूसाहेबांकडे पाठवून आपल्या शंकांचें समाधान महाराजांनींच केलें अशी त्यांची भावना होई. पोथी झाल्यावर बापूसाहेब पुन्हां महाराजांकडें जात ते संध्याकाळची फेरी झाल्यावर परत बिऱ्हाडीं येत. या वेळेला बापूसाहेब आपला दरबारी पोषाख करीत. रात्रीं चावडी असल्यास दरबारी पोषाखांत ते मशीदींत जात व मिरवणुकींत महाराजांवर छत्र धरीत. महाराज चावडींत स्थित झाल्यावर बापूसाहेब पोषाख बदलून तेथें शेजारती करीत हा त्यांचा नित्यक्रम ते शिरडीस असेपर्यंत अखंड चालला. फक्त पेन्शन आणण्याकरितां कोपरगांवीं जात त्या दिवशीं पोथील खंड पडत असे.

महाराजांनीं आपला देह दोन प्रहरच्या आरती नंतर मशिदींत सोडला व दुसरे दिवशीं संध्याकाळीं समाधि देईपर्यंत त्यांचा देह तेथेंच होता. दुसरे दिवशीं शिरडींतील लक्ष्मण भट कुळकर्णी यांचें स्वप्नांत महाराजांनीं येऊन सांगितलें कीं, " निजलास काय ऊठ. माझी आरती कर. बापूसाहेब आज माझी काकड आरती करीत नाहीं. त्याला वाटतें मी मेलों; पण त्याला सांग मी मशीदींतच आहे, " लक्ष्मण मामा लगेंच जागे होऊन स्नान केलें व

पूजासाहित्य घेऊन मशीदींत त्यांनीं महाराजांचे देहाची काकड आरती केली. या दृष्टांतामुळें दोन प्रहरच्या नित्य आरतीचा प्रश्नच राहिला नाहीं. नेहमीं प्रमाणें महाराजांच्या स्थूल देहाची मशीदींत पूजा व आरती बापूसाहेबांनीं केली. पूजा झाल्यावर नित्याप्रमाणें बापूसाहेबांनीं महाराजांचे हातावर दक्षिणा ठेवली. देह निर्जीव असल्यामुळें दक्षिणा हातांत रहावी म्हणून बापूसाहेबांनीं महाराजांचीं बोटें वळविलीं ; व चमत्कार असा कीं जरी महाराजांनीं देह सोडून २१ कलाक झाले होते तरी त्यांचीं बोटें ताठलीं नव्हतीं बापूसाहेबांनीं दक्षिणा देऊन मूठ मिटली ती तशीच राहिली. सायंकाळीं देह समाधींत ठेवला व तेंव्हांपासून त्रिकाळ आरती समाधिमंदिरांत होऊं लागली.

महाराजांनीं देह ठेवल्यावर बापूसाहेबांचे वैभवालाही उतरती कळा लागली. कुटुंबानें महाराजांबद्दल हाय घेतली व लौकरच त्यांत त्यांचा अंत झाला. बापूसाहेबांप्रमाणें शिरडींतच राहिलेले, बाळासाहेब भाटे, श्रीमंत बापूसाहेब बुट्टी, नानासाहेब निमोणकर यांनीं ही आपली इहलोकींची यात्रा संपविली. बापूसाहेबांचा स्वभावच असा होता कीं त्यांचें वाटेल त्यापाशीं पटत नसे. एकटे पडल्यामुळें बापूसाहेबांना शिरडींत करमेनासें झालें. पुढें पुढें तर त्रिकाल आरतीच्या वेळां शिवाय ते बाहेर पडेनासे झाले व कोणाशीं फारसें बोलतही नसत. त्यांचें मन साकोरीस उपासनी महाराजांकडें ओढ घेऊं लागलें. व शेवटीं ते कायमचे साकोरीला गेले. तेथें त्यांचें मन रमलें असेल परंतु शिरडींतील त्यांचा नूर साकोरीस त्यांच्या मुद्रेवर दिसला नाहीं.

महाराजांनीं देह ठेविल्यावर त्यांचे संबंधीं कांहीं धार्मिक समारंभ श्री क्षेत्र काशी येथें करण्याचा उपक्रम उपासनीमहाराजांनीं केला. त्या कामांत बापूसाहेबांनीं पुढाकार घेतला होता. स्वतःच्या पदरचे एक हजार रुपये काढून भक्तमंडळींकडून वर्गणीच्या रूपानें त्यांनीं बरीच मोठी रक्कम त्या समारंभाकरितां गोळा केली होती. याच प्रसंगीं बापूसाहेबांचा उपासनीमहाराजांशीं जिव्हाळ्याचा संबंध जडला असावा असें वाटतें. कारण

याच बापूसाहेबांनी एकेकाळीं उपासनीबाबांना धोतरानें बांधून शिर्डी येथील खंडोबाचे देवळांतून श्रीसाईमहाराजांपुढें मशिदींत खेंचित आणलें होतें. शिर्डी गांवांत कांहीं काळ राहिल्यावर उपासनीबाबांना गांवाबाहेरील खंडोबाचें देवळांत जाऊन राहण्याजी महाराजांनीं केली. व त्या प्रमाणें ते खंडोबाचें देवळांत एकटेच राहात असत. याप्रमाणें एकांतांत २–२॥ वर्षें त्यांनीं तेथें काढलीं त्यावेळीं त्यांनीं उग्र तपश्चर्या केली यांत शंका नाहीं व त्याचेंच फळ हल्लीं त्यांना मिळत आहे. शेवटीं शेवटीं तर ते उन्माद वृत्तींतच असत. अशावेळीं बापूसाहेबांना कांहीं कारणानें त्यांचेकडे खंडोबाचे देवळांत जाण्याचा प्रसंग आला. उपासनी महाराज आपल्या उन्माद वृत्तींतच होते. त्यांनीं बापूसाहेबांना दुरुत्तरें केलीं व अंगावर एक दगड फेंकला. बापूसाहेब कांहीं कमी नव्हते. त्यांची तामसीवृत्ति लगेच जागृत होऊन त्यांनींही तोंडीस तोड दिली. व वर लिहिल्याप्रमाणें उपासनी महाराजांना बांधून खेंचीत मशिदींत आणलें व महाराजांपुढें उभे करून आपलें गाऱ्हाणें सांगितलें. उपासनी महाराज मात्र मूक वृत्तीनें हा सर्व खेळ खालीं मान घालून स्तब्ध उभे होते. अर्थात हा सर्व खेळ महाराजांचाच होता. त्यांनीं बापूसाहेबांकडून उपासनी बाबांना बंधमुक्त करविलें व असे वेडेचाळे करूं नयेत अशा ताकीद देऊन परत त्यांना खंडोबाचे देवळांत पाठविलें; बापूसाहेबांचीही समजूत घातली. ही घडलेली हकीगत व बापूसाहेबांचे शेवटीं साकोरीस उपासनी महाराजांकडे जाऊन राहाणें या दोन गोष्टी सकृत्दर्शनीं विसंगत दिसतात पण त्या तशा नाहींत. जो प्रकार झाला तो महाराजांचेच इच्छेनें झाला. दोघावरही महाराजांची कृपा असल्यामुळें उभयतांचे मनांत अढी राहणें शक्य नाहीं. दोघेंही महाराजांचे एकनिष्ठ भक्त. त्यांचें गुरुबंधुत्वाचें नातें. श्री साईनाथ महाराज हे दोघांचेंही ध्येय व उपास्यदैवत. तेव्हां दोघांनीं महाराजांनीं देहविसर्जन केल्यावर एकत्र कालक्रमण करणें यांत विसंगतपणा कोठें राहिला ?

एकंदरींत बापूसाहेबांनीं आपल्या आयुष्यांतील शेवटचा काल सत्कारणीं लावला व त्याप्रमाणें महाराजांनीं त्यांना आपल्या पायाजवळ आणून योग्य स्थान दिलेंच असेल. काकासाहेब दीक्षितांचें देहावसान झाल्यावर एका साई भक्ताला झालेला दृष्टांत त्यांनीं आम्हांला कळविला होता. त्याची संगति बापूसाहेबांच्या मृत्यूशीं लागते असें वाटतें म्हणून वाचकांचे माहिती करितां तो देणें अप्रयोजक होणार नाहीं. दृष्टांत येणेंप्रमाणें होता. महाराजांचा दरबार भरला होता. मध्यस्थानीं उच्चासनावर महाराज विराजमान झाले होते. दरबारांत बरीच मंडळी होती. त्यांत महाराजांचे निधनानंतर मृत्यु पावलेली नानासाहेब चांदोरकर, निमोणकर. म्हाळसापति, बापूसाहेब बुटी, बाळासाहेब भाटे वगैरे ओळखीची मंडळी होती. एका आसनावर काकासाहेब आपल्या नेहमीच्या पोषाखांत डोळे मिटून ध्यानस्थ बसले होते. व त्यांचे शेजारीं एकच आसन रिकामें होतें. हा सर्व थाट पाहून दृष्टांत झालेल्या भक्तानें महाराजांना विचारले कीं, " बाबा, ही सर्व मंडळी डोळे उघडे ठेऊन बसली आहेत पण एकट्या काकासाहेबांचेच डोळे कां मिटलेले आहेत व त्यांच्या शेजारीं फक्त एकच आसन सर्व दरबारांत मोकळें कां आहे ? " महाराजांनीं उत्तर दिलें कीं 'काका आतांच आला आहे व तो सहा महिनें असाच डोळे मिटून बसेल. आणि त्या ६ महिन्यांत माझा आणखी एक भाऊ येथें येईल तो त्या रिकाम्या आसनावर बसेल. काकासाहेबांचें मृत्युनंतर सहा महिनें पुरे होण्याचे थोडे आधींच बापूसाहेब ब्रह्मीभूत झाले. तेव्हां दृष्टांता प्रमाणें दरबारांतील रिकाम्या आसनावर बापूसाहेब महाराजांसन्निध जाऊन बसले असें अनुमान काढल्यास वावगें होणार नाहीं.

महाराजांचे अंतकाळीं त्यांचे वापरण्यांत असलेलीं चिलीम व सटका महाराजांचे सान्निध्यांतील सेवेकरी माधव यानें बापूसाहेबांचे स्वाधीन केला. या दोन्हीं वस्तू बापूसाहेबांनीं नित्य पूजेस ठेविल्या होत्या व जातांना साकोरीस बरोबर नेल्या. साईभक्तांचे दृष्टीनें या दोन्हीं वस्तू फार महत्वाच्या

आहेत व त्या शिरडी संस्थानांत जतन करून ठेविल्या पाहिजेत. शिरडी संस्थानच्या ट्रस्टींनीं त्या परत आणून संस्थानांत ठेवाव्या अशी आमची त्यांना सूचना आहे

× × × ×

ह. भ. प. दासगणु बुवाकडून आम्हांस कळविण्यांत आलें आहे कीं येत्या रामनवमीला शिरडीस मोठा अपूर्व योग येणार आहे. श्री. पाचलेकर बाबा महाराज त्या वेळीं शिरडीस येणार आहेत. त्यांचें वय अवघें १४ वर्षांचें असून मोंगलाईंत त्यांचा लौकिक साधू असा फार मोठा आहे. श्री. शंकराप्रमाणें त्यांचे अंगावर नेहमी सर्प खेळत असतात. अशा सत्पुरुषाच्या दर्शनाचा श्री साई भक्तांनीं लाभ घ्यावा अशी ह. भ. प. दासगणु बुवांची फार इच्छा आहे. तेव्हां रामनवमीच्या उत्सवाला शिरडीस येऊन उत्सव साजरा करावा व अनायासें प्राप्त होणाऱ्या या सत्पुरुषाच्या दर्शनाची संधी वांया घालवूं नये अशी आमची सर्व साईभक्तांना आग्रहाची विनंती आहे. सालाबाद प्रमाणें श्री रामनवमीचा उत्सव चैत्र शुद्ध ७मी पासून सुरू होईल.

× × × ×

श्रीसाईभक्तमंडळांपैकीं व पूर्वी आपल्या व्यवस्थापक मंडळांचे सभासद असलेले हरद्याचे रा. रा. कृष्णराव उर्फ छोटु भय्या पारूळकर यांना सरकारनें "रावसाहेब" ही पदवी दिली याबद्दल आम्हीं त्यांचें अभिनंदन करतों. रावसाहेब पारूळकर हरद्यास फर्स्ट क्लास ऑनररी मॅजिस्ट्रेट आहेत. गेल्या कित्येक वर्षांपासून ते शिरडीस येत असतात, व महाराजांचे ठिकाणीं त्यांची अढळ निष्ठा आहे.

× × × ×

## श्रीसाईलीलेच्या वाचकांस विनंती

श्रीसाईलीलेचे असे पुष्कळ ग्राहक आहेत कीं त्यांचीं नावें श्री शिर्डी संस्थानचे भक्तमंडळाचे यादींत दाखल नाहींत. विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं त्यांतील पुष्कळ गृहस्थ श्रीसाईबाबा देहधारी असतां वेळोवेळां मोठ्या प्रेमानें त्यांच्या दर्शनास शिर्डीसही येत असत. इतकेंच नाहीं तर त्यांच्यापैकीं कांहीं श्रीसाईबाबांच्या देहावसानानंतर अजूनही शिर्डीस होणारे त्यांचे उत्सवास मोठ्या आवडीनें व भक्तीनें येत असतात. कांहीं ना कांहीं निमित्तानें लहान मोठी वर्गणी पाठवून त्या उत्सवांत भागही घेत असतात. पण भक्तमंडळांत त्यांचीं नांवें नाहींत. त्यावरून आपलीं नांवें या मंडळांत दाखल नसावींत असेंच सर्वांस वाटत असेल असें खात्रीनें म्हणतां येणार नाहीं. यांपैकीं कित्येक असेही असतील कीं त्यांचे गुरु खुद्द श्रीसाईबाबा नसून त्यांचेच सारखे आणखीही कोणी असतील; शिरडीच्या भक्तमंडळांत आपलीं नांवें कशाला असें त्यांनीं म्हटल्यास चालेल; पण असे जे नसतील व ज्यांचा श्रीसाई हे आपले गुरू म्हणून त्यांजकडे मनोभावानें ओढा असेल अशांचीं नांवें भक्तमंडळांत पडल्यानें त्या नात्यानें शिरडीच्या श्री साईबाबांच्या संस्थेशीं त्यांचा कायमचा संबंध जुळून ते त्या संस्थेचे घटक होतील व तसें झालें म्हणजे या संस्थेच्या व्यवस्थेमध्यें सहजच त्यांनाही भाग घेतां येऊन या संस्थेच्या कार्यकारी मंडळास, आपलें कार्य आहे त्यापेक्षां उत्कृष्टरीतीनें होण्यास त्यांची सल्लामसलत घेण्याचा लाभ मिळेल.

श्रीसाईलीलेच्या शके १८४५ च्या वैशाखच्या अंकांत श्रीशिर्डी संस्थानच्या व्यवस्थेची डिस्ट्रिक्ट कोर्टानें मंजूर केलेली स्कीम छापली आहे. ५ ट्रस्टी १ चेअरमन, १ खजीनदार, १ सेक्रेटरी, १ मदतनीस सेक्रेटरी व १ मदतनीस खजीनदार व शिवाय कांहीं सभासद मिळून एकंदर १५ असामीचें कार्यकारी

मंडळ ठरलेलें आहे. त्यांपैकीं ट्रस्टीखेरीजकरून बाकीच्या सर्व सभासदांची दर तीन वर्षांस नवीन निवडणूक होत असते.

जे लोक भक्तमंडळाचे सभासद होण्याबद्दल आपली इच्छा प्रदर्शित करतील व संस्थानचे खर्चाकरितां वर्षास निदान ( ५ ) पांच रुपये तरी देण्यास कबूल होतील त्यांचा या भक्तमंडळांत समावेश केला जातो.

वर निर्दिष्ट केलेल्या स्कीमचे १० वे नियमाप्रमाणें भक्तमंडळ स्थापन करण्याकरितां व त्या मंडळाचे व शिर्डी संस्थान कमिटीच्या सभा भरविण्याचे संबंधानें झालेले नियम श्रीसाईलीलेंत छापलेले आहेतच; तरी ते अवलोकनांत घेऊन आपलीं नांवें दाखल होण्यासाठीं ज्यांचेकडून वर्षास निदान ५ रु० वर्गणी येईल त्यांचीं नांवें भक्तमंडळांत दाखल करून तसें केल्याबद्दल त्यांना कळविलें जाईल व जेव्हां जेव्हां या कमिटीच्या व्यवस्थेसंबंधानें भक्तमंडळाच्या सभा भरतील तेव्हां तेव्हां त्यांना निमंत्रणें केलीं जातील.

—संपादक

# श्रीसंस्थान शिर्डी शके १८४८ चे गुरुपौर्णिमेच्या उत्सवाचा हिशेब

## जमा.

| | |
|---|---|
| १५५৶=। | श्रीसमर्थांचे पेटींत उत्सवाचे दिवसांत पडलेली रक्कम. |
| ३३६॥-। | श्री. केशवराव गोपाळराव बुटी व बंधु यांची रक्कम. |
| २२९৶-। | किरकोळ वर्गणी. |
| २०६৶-। | मुंबईखातें व शिर्डीखातें जमा. |

**तपशील**

२५ रा. रामराव सदानंद रावटे. श्रींचे अंगावर गलेफ करून घालण्यासाठीं व बाकी उरलेली रक्कम कायमफंडांत जमा होण्यासाठीं.
२ रा. बाबाजी आनंदराव मोहिले वस्ती पालघर.
१ रा. शंकर आर. कानजी.
३ रा. मोरेश्वर विष्णु जोशी उंबरगांव.
२ रा. नारायण बाळाजी राणे, राई.
१० मि. एच. सी कुपर, मुंबई.
५ रा. दिनकर मोरेश्वर पाटकर, ठाणें.
५ श्री. सुलोचनाबाई वांकडे, वांद्रें.
२ रा. नारायण गणेश वागळे वांद्रें.
२ रा. आनंदराव पर्शराम डोळ्स, कांदिवली.

## नांवें

५२९ भोजन खर्च

| | |
|---|---|
| ५८। | गहूं मण ৶५ |
| ७१॥≡॥ | तांदुळ मण ৶३ |
| १५॥ | डाळ तुरीची पायली १४ |
| २॥ | डाळ हरभऱ्याची पायली २ |
| ४।॥- | रवा शेर ৶१६ |
| ६॥= | बेसन शेर ৶१६ |
| ९४ | तूप |
| ५२৶≡॥ | गूळ मण ৶२৶३ |
| ३८॥= | साखऱ्या ৶२॥७ |
| १५ | पत्रावली १५०० |
| २॥ | द्रोण १००० |
| १३।≡॥ | गोडें तेल डबा १ |
| १९॥-॥ | दूध, दहीं |
| ८॥-॥ | शाकभाजी |
| ४६ ।-। | किरकोळ सामान |
| ४० | आचाऱ्यांचा पगार |
| ३२॥- | सामान तयारी बद्दल मजुरी |
| ५॥= | सामान आणणें गाडीभाडें. |

---

५२९

२१ बॅंड राहातें येथील
६॥ आवाजाची दारु

| जमा | नांवें |
|---|---|
| ५ रा. दाजी विठ्ठल सांबारे, पारलें. | १५ रा. गोपाळराव हरिदास किर्तनकार यांस इनाम |
| ५ रा. जनार्दन धोंडदेव करंदीकर. | ३०८ संस्थानचे सामान खर्च झालेल्या बिलाची रक्कम. |
| २ रा. सत्यवान रामचंद्र मयेकर, वांद्रें. | २ रा. रा. बाळकृष्ण यांचे मनीआर्डरचे कुपनांत लिहिल्यावरून पेटींत दक्षिणा. |
| ५ श्रीं. शांताबाई ब्रह्मांडकर मुंबई. | १। रा. रा. माधवराव गंगाधर यांचे कुपनांत लिहिल्यावरून पेटींत दक्षिणा. |
| ३ श्री. बाळकृष्ण भिकाजी शहापूर. | २। एक हजार लेवलची किंमत |
| २ रा. मंगेश मोरेश्वर पाट, कर, शाहापूर | १। फुलाची चादर भय्यासाहेबांकरितां. |
| ४ रा. बाळकृष्ण विश्वनाथ देव, कुर्ला. | १॥। त्यांचे सांगण्यावरून कमालखानीं हार. |
| १ श्री. पार्वतीबाई ओझरकर, ऊर्फ आऊताई देशमु॥ ठाणें. | ६१॥। पोस्टेज खर्च. |
| २ रा. वासुदेव रामचंद्र घोलप, ठाणें. | ३०॥ आमंत्रण कार्डासाठीं तिकिटें. |
| ६ रा. लक्ष्मण दामोदर ठाकूर सांताक्रुझ. | २८॥। प्रसाद पाठविण्यास तिकिटें. |
| ३ गुरुपौर्णिमा शके १८४७ | २८॥। मुंबई पोस्टेज खर्च. |
| ३ ,, ,, १८४८ | |
| ६ | ६१॥। |
| ३ रा. खंडेराव माधवराव जयकर, मुंबई. | २५ रा. रा. रामराव सदानंद रावटे यांचे खर्चाचा तपशील |
| १ रा. कृष्णजगेश्वर भीष्म मोहपे, जि. नागपूर. | ९।= गलेफास कापड |
| | ७॥ फीट |

| जमा | नांवें |
|---|---|
| २ रा. चिंतामण आर. सातघरे, वांद्रें. | -॥- गलेफ शिलाई |
| १ रा. डी. जी. देशमुख, मुंबई. | ७।≈ कायमफंडाकडे |
| २ रा. जी. डब्ल्यु. देसाई. | २५ |
| १। रावसाहेब डी. व्ही. परूळकर, विरार. | १० मि. एच. सी. कुपर य रकमेचा खर्च |
| २ रा. वामन नारायण फाडकर | १। चादर |
| ३ गोविंद नारायण सामंत. वांद्रें. | -॥- उदबत्ती |
| २। रा. रामचंद्र सखाराम खानोलकर. | १। खडीसाखर |
| ३ रा. सुमनराजाराम वालावलकर, मुंबई. | ७ त्याचे तर्फे गोरग बांस वाटले |
| २ सौ. सिताबाई राजाराम वालावलकर. | १० |
| २ रा. जे. आर. दळवी, दरोगा. | ३४≈ प्रसाद तयार करण्या सामान वगैरे. |
| ५ रा. रामचंद्र रामकृष्ण सामंत, वांद्रें. | ९ पिशव्या तयार करणें कापड शिलाई ६॥ × २॥ |
| १० रा. व्यंकट लिंबाजी कोडल | २ श्रीगुरुपौर्णिमेचे कार्ड व प्रसा पाठविणेचे व लिहीण्या कामाबद्दल इनाम. |
| २ रा. यशवंत जनार्दन गाळवणकर. | ७२०॥।०॥। |
| २ रा. रजबअल्ली महंमद, वांद्रें | |
| १। रा. रुक्मीणीबाई पांडुरंग ऊर्फ बेबी पुरंदरे, वांद्रें. | |
| २॥ रा. आत्माराम नथोबा जोशी. | |

जमा

१। रा. गणेश त्रिंबक गायधनी
५ रा. नारायण पिराजी
२ रा. आर. जी. प्रधान.
१। रा. सांवळाराम आत्माराम शिरोडकर.
३ रा. वासुदेव सीताराम सामंत.
५ रा. गजानन महादेव वायंगणकर.
५ रा. एच. आर. क्लार्क खंबायत.
२ रा. एस. जी. परुळकर, होळकरस्टेट.
१ रा. सदाशिव विश्वनाथ देव.
१ रा. सदाशिव सीताराम देशपांडे.
१ रा. यशवंतराव गोविंद सुळे
२ रा. एच. व्ही. मसुरकर.
१ रा. बी. व्ही. वैद्य, वांद्रें.
१ रा. जी. एन. चौबळ. ,,
७ रा. शामराव बी. कंटक.
२ रा. एस. एस. तातारे.
२ रा. विश्वनाथ लक्ष्मण नुलकर.
१८॥ रा. नारायण गोविंद काजळे.
५ रा. आत्माराम केशव कुळकर्णी
२ रा. यशवंत राजाराम जुमरकर.

जजा

२ रा. रावजी बाळकृष्ण उपासनी.

५ रा. भिकाजी नारायण पंडीत.

१ रा. पर्शराम नाचणे,अंधेरी.

५ रा. बापू भया कोठारी.

२ रा. बाळकृष्ण रामचंद्र.

१ रा. माधवराव गंगाधर.

---

२०६८१

२३ नागपूर श्रीमंत बुटी खातीं जमा.

तपशील.

५ एम. आर. मुधोळकर उमरावती.

५ भाई नरमदा गणपतराव

२ रा. हीरालाल बन्सीलाल सराफ.

१ रा. बहीरु बाळाजी बेराटे

२ रा. गोविंदराव नारायण गुप्ते.

१ श्री. बुधीबाई.

१ श्री. सुंदराबाई.

१ रा. गणपतराव मोरेश्वर कोठारे.

१ सौ. चंपूबाई कोठारे.

१ रा. सदानंद विनायक तळपदे.

२ रा. विठ्ठल कृष्ण मेढेकर.

१ मनीआर्डर ता. २७-७-२६.

---

२३

---

१०॥१०॥